सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वनविभाग
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय
मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी कॉलनी ठाणे पूर्व, पिन- 400 603
दुरध्वनी क्रमांक - 022-25329642 / 25329865
Email: ccftthane@mahaforest.gov.in /ccfthane@gmail.com

---

**विषय : एकरेषिय (Linear) प्रकल्पांबाबत झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी (Working Permission) देण्याबाबत.**

**सिडको नवी मुंबई प्राधिकरणाचा प्रस्तावित उलवा सागरतटीय रोड, एम.टी.एच.एल. ते आमरा मार्ग लिंक रोड, मौजे तारघर, ता. पनवेल, जिल्हा रायगड 32.6921 हेक्टर वनजमिन वळतेकरण प्रस्ताव.**

जा.क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.04/22-23/जा.क्र.551/23-24
ठाणे - 400603, दिनांक - 30/01/2024.

**वाचा:-**

1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व कैंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-17/नोडल/ठाणे/आयडी-13288(77)/477, दिनांक 31.05.2022.
2) राज्य शासन पत्र क्र.FLD-1322/CR-190/F-10, दि.12.08.2022.
3) केंद्र शासननाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, नागपूर कडील पत्र क्र.F. No. FC-I/MH-191/2022-NGP/10483, दि.19.10.2022.
4) उपवनसंरक्षक अलिबाग यांचेकडील पत्र क्र.ब/20/जमिन/वसं/153, दिनांक 18.04.2023.
5) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.04/44, दिनांक 24.04.2023.
6) केंद्र शासननाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, नागपूर कडील पत्र क्र.F. No. FC-II/MH-191/2022-NGP/12721, दि.08.01.2024.
7) प्रकल्प यंत्रणा, जनरल मॅनेजर (वने), सिडको यांचे पत्र क्र.CIDCO/GM(Forest)/2024/2215, दि.18.01.2024.
8) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-11-306/2014/एफसी, दि. 08.08.2014.
9) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-1-306/2014/एफसी, दि. 15.01.2015.
10) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं.11/306/2014, दि. 07.05.2015.
11) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-1-306/2014-एफसी पार्ट दि.28.08.2015.
12) शासन परिपत्रक क्र.एफएलडी-2015/प्र.क्र.77/फ-10, दि.01.07.2015.

**आदेश -**

जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने), सिडको भवन, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई या प्रकल्प प्राधिकरणाचा उलवा सागरतटीय रोड, एम.टी.एच.एल. ते आमरा मार्ग लिंक रोड, मौजे तारघर, ता. पनवेल, जिल्हा रायगड 32.6921 हे. वनजमिन वळतेकरण प्रस्ताव विहित मार्गाने सादर झाल्यानंतर अपर प्रधान

मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांच्याकडून उपरोक्त अ.क्र.1 अन्वये राज्य शासनास सादर केला होता. तद्नंतर सदर प्रस्ताव अ.क्र. 2 अन्वये राज्य शासनाकडून केंद्र शासनास सादर झाला होता.

आणि ज्याअर्थी जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने), सिडको भवन, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला वनजमिन वळतेकरण प्रस्ताव, भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम 1980 च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (Site Specific) आहे.

आणि ज्याअर्थी, उप वनसंरक्षक, अलिबाग, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर आणि राज्य शासनाकडून या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम 1980 च्या तरतुदीनुसार 32.6921 हेक्टर वनजमिन वळते करण्याची केंद्र शासनास शिफारस केली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र सरकारने या प्रस्तावावर विचार करुन, केंद्र शासनाकडून सादर केलेल्या प्रस्तावास अ.क्र.3 अन्वये काही अटी शर्तींच्या अधिन राहून तत्वतः मंजुरी तसेच अ.क्र. 6 अन्वये काही अटी शर्तींच्या अधिन राहून अंतीम मान्यता प्रदान केली आहे. त्यास अनुसरुन प्रकल्प प्राधिकरणाने पर्यायी वनीकरण, वनाचे प्रत्याशी मुल्य आणि वृक्षनिष्कासनासाठीची अपेक्षित रक्कम कॅम्पा प्राधिकरणाकडे तसेच उप वनसंरक्षक अलिबाग यांचेकडे वर्ग केली आहे. केंद्र शासनाच्या तत्वत: मंजूरी पत्रातील अटी / शर्तीचा पूर्तता अहवाल उप वनसंरक्षक, अलिबाग यांनी अ.क्र. 4 च्या पत्रान्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांच्याकडे सादर केला आहे. सदरचा अहवाल अ.क्र. 5 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालयास सादर केला आहे. केंद्र शासन अंतीम मान्यता पत्रातील कोणत्याही अटीचे उल्लंघन हे वन (संरक्षण एवम संवर्धन) अधिनियम, 1980 चे उल्लंघन असेल आणि सदर कायद्याच्या तरतुदीनुसार जारी केलेल्या नियम / मार्गदर्शनानुसार कारवाई केली जाईल.

प्रकल्प प्राधिकरणाने अ.क्र. 7 अन्वये कांदळवन वृक्षतोडीसाठी लागणारी मा. उच्च न्यायालायच्या आदेशाची प्रत सादर करून प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात कामे सुरु करणेची व वृक्षतोडीची परवानगी (Working Permission) मिळणेबाबत विनंती केली आहे.

सदर प्रस्तावातील केंद्र शासनाच्या तत्वत: मान्यता पत्रातील अटी-शर्तीनुसार विविध प्रयोजनासाठी प्रकल्प प्राधिकरणाने खालील प्रमाणे रक्कमा कॅम्पा प्राधिकरणाकडे अदा केलेल्या आहेत.

| अ. क्र. | रक्कम हस्तातंरीत केल्याचा दिनांक | प्रयोजन | रक्कम (रू.) | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | 13.12.2022 | वनाचे प्रत्याशी मूल्य (Net Present Value) | 4,66,78,303/- | सदर रक्कम प्रकल्प यंत्रणेने कॅम्पा प्राधिकरणाकडे अदा केलेली आहे. |
| 2. | | पर्यायी वनीकरण (CA) | 2,50,60,325/- | |
| 3. | | पर्यायी वनीकरण क्षेत्रात वनतलाव/ साठवणतलाव करणेसाठीची आवश्यक रक्कम. (Water Body Creation) | 56,00,000/- | |
| 4. | | सर्वेक्षण व सीमांकन (Survey & Demarcation) | 16,50,000/- | |
| **एकूण (A)** | | | **7,89,88,628/-** | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | 21.12.2022 | वृक्ष निष्कासनासाठी लागणारी आवश्यक रक्कम | 12,44,654/- | उप वनसंरक्षक, अलिबाग यांचेकडे सदरची रक्कम धनाकर्षाद्वारे (DD) जमा करण्यात आलेली आहे. |
| 6. | | रस्ता दुतर्फा रोपांची लागवड (Avenue Plantation) | 26,29,538/- | |
| 7. | | संयुक्त वनव्यवस्थापन समितींच्या सहभागाने रोपवाटीका तयार करून 35000 विविध वन प्रजातीची रोपे प्रस्तावित क्षेत्राच्या सभोवताली तसेच स्थानिकांना वाटप करण्यासाठी तयार करणे साठीची रक्कम | 39,09,766/- | |
| **एकूण (B)** | | | **77,83,958/-** | -- |
| **एकूण एकंदर (A+B)** | | | **8,67,72,586/-** | -- |

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन पत्रातील अट क्र.6 अन्वये प्रस्तावित वनक्षेत्रात कमीत कमी वृक्षतोड होईल याची दक्षता प्रकल्प यंत्रणेने घेणे आवश्यक आहे तसेच सदर वृक्षतोड उपवनसंरक्षक अलिबाग यांचे देखरेखेखाली होणे अपेक्षित आहे. प्रकल्प यंत्रणेने वृक्षनिष्कासनासाठी उप वनसंरक्षक, अलिबाग यांचेकडे 12,44,654/- इतकी रक्कम धनाकर्षाद्वारे (DD) जमा केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन पत्रातील अट क्र.8 ला अनुसरून वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून प्रकल्प प्राधिकरणाने प्राप्त करून सादर केलेले नाही. प्रकल्प प्राधिकरणाने जलद गतीने वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून प्राप्त करून घेणे अपेक्षित आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक / पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन / मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील, याबाबत प्रकल्प यंत्रणेने वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून प्राप्त करून घेणेबाबत बंधपत्र सादर केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन पत्रातील अट क्र.9 ला अनुसरून संयुक्त वनव्यवस्थापन समितींच्या सहभागाने रोपवाटीकेत विविध वन प्रजातीची, 35000 रोपे जसे बांबू, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत आणि स्वदेशी / स्थानिक रोपे 10 वर्षासाठी तयार करण्यात यावीत व त्यातील 50% रोपे प्रकल्पांतील प्रस्तावित वनक्षेत्रा सभोवती लावणे आणि उर्वरीत 50% रोपे लागवडीसाठी स्थानिकांना त्यांच्या निवडीप्रमाणे वाटप करणे आवश्यक आहे. संबंधित संयुक्त वनव्यवस्थापन समितीने रोपे लागवडीचा / रोपे वाटपाचा अभिलेखा जतन करुन ठेवावा. सदर अटीबाबत प्रकल्प यंत्रणेने उपवनसंरक्षक अलिबाग यांचेकडे रक्कम रुपये 39,09,766/- धनाकर्षाव्दारे अदा केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.10 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार पर्यावरणीय मान्यता मिळविणे अपेक्षित आहे. त्यास अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.11 ला अनुसरुन सदर प्रस्तावात 3728 कांदळवन वृक्षाची तोड असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले रिट याचिका क्रमांक 14630/2022 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक 16.01.2024 रोजी काही अटी / शर्तींच्या अधिन राहून 3728 कांदळवन वृक्षांच्या तोडीस मान्यता दिली आहे, सबब त्यापेक्षा अधिक वृक्षांची तोड होणार असल्यास मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेणे प्रकल्प यंत्रणेस आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 12 ला अनुसरुन IRC norms प्रमाणे 8 फुट उंचीचे वृक्षांची रस्ता दुतर्फा लागवड (avenue plantation) प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वनविभागाकडून करणेचे आहे. IRC norms प्रमाणे 8 फुट उंचीचे वृक्षांची रस्ता दुतर्फा लागवड (avenue plantation) करीता उपवनसंरक्षक अलिबाग यांनी प्रकल्प प्राधिकरणाकडून लागणारी अपेक्षित अंदाजपत्रकीय रक्कम रु.26,29,538/- दि.21.12.2022 रोजी प्राप्त केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 16 मध्ये वळतेकरण क्षेत्राचे सीमांकन करणे प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने करावयाचे आहे. त्यासाठी प्रकल्प यंत्रणेने रक्कम रु.16,50,000/- दि.13.12.2022 रोजी कॅम्पा प्राधिकरणाकडे अदा केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, वरील अ.क्र.8, 9 व 10 अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेले आहेत. तसेच केंद्रशासनाने वरील अ.क्र.11 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन प्रा., पाण्याची पाईप प्रा., ऑप्टीकल फायबर केबल प्रा., रेल्वे प्रा. इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाचे वरील अ.क्र.12 चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

म्हणून आता याव्दारे असे निर्देश देत आहे की, सदरचा प्रकल्प एकरेषीय असल्यामुळे व याबाबत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना अस्तित्वात असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने), सिडको भवन, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई यांना उलवा सागरतटीय रोड, एम.टी.एच.एल. ते आमरा मार्ग लिंक रोड, मौजे तारघर, ता. पनवेल, जिल्हा रायगड 32.6921 हे. वनजमिन वळतेकरण प्रस्तावास खाली दिलेल्या अनुसूची मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रात झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेस परवानगी (Working Permission) देण्यात येत आहे. ही परवानगी खालील अटी/शर्ती पूर्ततेच्या अधिन राहून देण्यात येत आहे:-

1) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वळतेकरण क्षेत्रात कामे करणे व झाडे तोडण्यापुरती मर्यादित आहे. आणि सदर परवानगी एक वर्षासाठीच म्हणजेच दि.30.01.2025 पर्यंतच वैध (Valid) राहील. दिनांक 31.01.2025 पासून सदर परवानगी आपोआप रद्द झालेचे समजण्यात येईल.

2) केंद्रशासन पत्रातील अट क्र. 6 अन्वये प्रस्तावित वनक्षेत्रात कमीत कमी वृक्षतोड होईल याची दक्षता प्रकल्प यंत्रणेने घेणे आवश्यक आहे तसेच सदर वृक्षतोड उपवनसंरक्षक अलिबाग यांचे देखरेखेखाली होणे अपेक्षित आहे. प्रकल्प यंत्रणेने वृक्षनिष्कासनासाठी उप वनसंरक्षक, अलिबाग यांचेकडे 12,44,654/- इतकी रक्कम धनाकर्षाद्वारे (DD) जमा केलेली आहे.

3) केंद्रशासन पत्रातील अट क्र. 8 ला अनुसरून वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून प्रकल्प प्राधिकरणाने प्राप्त करून सादर केलेले नाही. प्रकल्प प्राधिकरणाने जलद गतीने वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून प्राप्त करून घेणे अपेक्षित आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक / पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन / मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील, याबाबत प्रकल्प यंत्रणेने वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून प्राप्त करून घेणेबाबत बंधपत्र सादर केलेले आहे. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

4) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 9 ला अनुसरून संयुक्त वनव्यवस्थापन समितींच्या सहभागाने रोपवाटीकेत विविध वन प्रजातीची, 35000 रोपे जसे बांबू, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत आणि स्वदेशी / स्थानिक रोपे 10 वर्षासाठी तयार करण्यात यावीत व त्यातील 50% रोपे प्रकल्पांतील प्रस्तावित वनक्षेत्रा सभोवती लावणे आणि उर्वरीत 50% रोपे लागवडीसाठी स्थानिकांना त्यांच्या निवडीप्रमाणे वाटप करणे आवश्यक आहे. संबंधित संयुक्त वनव्यवस्थापन समितीने रोपे लागवडीचा / रोपे वाटपाचा अभिलेखा जतन करुन ठेवावा. सदर अटीबाबत प्रकल्प यंत्रणेने उपवनसंरक्षक अलिबाग यांचेकडे रक्कम रुपये 39,09,766/- धनाकर्षाव्दारे अदा केलेले आहे.

6) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.10 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार पर्यावरणीय मान्यता मिळविणे अपेक्षित आहे. त्यास अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केलेले आहे.

7) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.11 ला अनुसरुन सदर प्रस्तावात 3728 कांदळवन वृक्षाची तोड असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले रिट याचिका क्रमांक 14630/2022 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक 16.01.2024 रोजी काही अटी / शर्तींच्या अधिन राहून 3728 कांदळवन वृक्षांच्या तोडीस मान्यता दिली आहे, सबब त्यापेक्षा अधिक वृक्षांची तोड होणार असल्यास मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक आहे.

8) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 16 मध्ये वळतेकरण क्षेत्राचे सीमांकन करणे प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने करावयाचे आहे. त्यासाठी प्रकल्प यंत्रणेने रक्कम रु.16,50,000/- दि.13.12.2022 रोजी कॅम्पा प्राधिकरणाकडे अदा केलेली आहे.

9) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत क्षेत्रात कामे सुरु करण्यापूर्वी, उप वनसंरक्षक अलिबाग यांना कळविणे आवश्यक आहे. उप वनसंरक्षक अलिबाग यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित वन जमीनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे. वनभंग झाल्याचे निर्दशनास आल्यास केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायु मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र.1.21 अनुसार कारवाई करतील.

11) प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता काही उपाययोजना सुचविल्यास आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.

12) प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात प्रकल्प प्राधिकरणाकडून कामे करताना वनसंपदेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

13) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.1, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23 व 24 बाबत प्रकल्प यंत्रणेने दिलेले बंधपत्रातील मुद्दयांबाबत प्रकल्प प्राधिकरणाकडून विहित कालावधीत पूर्तता केली जाईल याबाबत उपवनसंरक्षक, अलिबाग यांची जबाबदारी राहील.

उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) उपवनसंरक्षक, अलिबाग हे वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायु मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र.1.21 अनुसार अहवाल सादर करतील.

**अनुसूची**

| Sr. No. | Division | District | Taluka | Village | Gut No. | Area (Ha.) | Land Status |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Alibag | Raigad | Panvel | Targhar | 55 | 0.4243 | Private Forest |
| 2. | | | | | 43 | 2.9721 | Mangrove Forest |
| 3. | | | | | Creek | 1.6812 | Mangrove Forest |
| 4. | | | | | 44 | 0.4809 | Private Forest |
| 5. | | | | | 29 | 0.1907 | Mangrove Forest |
| 6. | | | | | 41 | 2.1035 | Mangrove Forest |
| 7. | | | | | 40 | 0.0082 | Mangrove Forest |
| 8. | | | | | 42 | 0.2375 | Mangrove Forest |
| 9. | | | | | 31 | 0.8680 | Mangrove Forest |
| 10. | | | | | 32 | 0.3339 | Mangrove Forest |
| 11. | | | | | 33 | 1.7480 | Mangrove Forest |
| 12. | | | | | 34 | 0.6575 | Mangrove Forest |
| 13. | | | | | 30 | 0.3247 | Mangrove Forest |
| 14. | | | | Vahal | Panvel Creek | 7.7879 | Mangrove Forest |
| 15. | | | | Gavan | Old 391/463 | 7.7958 | Mangrove Forest |
| 16. | | | | | 132 | 1.7985 | Mangrove Forest |
| 17. | | | | | 131 | 0.5052 | Mangrove Forest |
| 18. | | | | | 440 | 0.2135 | Mangrove Forest |
| 19. | | | | | 67 | 0.2133 | Mangrove Forest |
| 20. | | | | | 69 | 0.6242 | Mangrove Forest |
| 21. | | | | | 63 | 0.0382 | Mangrove Forest |
| 22. | | | | | 433 | 0.1755 | Mangrove Forest |
| 23. | | | | | 70 | 0.5401 | Mangrove Forest |
| 24. | | | | | 72 | 0.1466 | Mangrove Forest |
| 25. | | | | | 441 | 0.3265 | Mangrove Forest |
| 26. | | | | | 62 | 0.2070 | Mangrove Forest |
| 27. | | | | | 61 | 0.2891 | Mangrove Forest |
| **Total** | | | | | | **32.6921** | -- |

सदर आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर, सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

Sd/-
**(के. प्रदिपा)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**

प्रति,

उप वनसंरक्षक, अलिबाग.

प्रतिलिपी :- प्रधान सचिव (वने) मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने), सिडको भवन, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई यांजकडे माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

2.00 निर्देशित करण्यात येते की, या संदर्भातील सर्व आदेश सर्व्हे क्र., क्षेत्र आणि वैधानिक दर्जा आणि राज्य शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एका स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत आणि त्याची प्रत संबंधित विभागास देण्यात यावी.

प्रतिलिपी :- एकरेषिय प्रकल्प निवड नस्ती, वनवृत्त कार्यालय ठाणे.

प्रतिलिपी - कक्ष-11 (तांत्रिक), वनवृत्त कार्यालय ठाणे यांचेकडे वरील आदेश शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी रवाना.

K. P.
**(के. प्रदिपा)** 30/1/24.
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**